# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त)) (ISO 9001:2008)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. (०२२) २६४७१२५५ (का.)/ २६४७०९१६ (वै.) फॅक्स क्र. (०२२) २६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/ 1TimeOpportunity/२०११/ ५७५२ दिनांक – 10 JUN 2011

**परिपत्रक**

**विषय :- One Time Opportunity for students of GPDL & Part Time Diploma Program**

ज्या संस्थांमधील उपरोक्त विषयांकित अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २००८-०९ पर्यंत 'C' स्कीम सुरु होती. परंतु सन २००९-२०१० पासून E' स्कीम सुरु झालेली आहे. अशा संस्थांमधील 'C' स्कीममधील तृतीय वर्षातील पाचवे व सहावे सत्राचे ज्या विद्यार्थ्यांचे निकाल Fail / LSP आहेत त्यांना सन २०११-२०१२ मध्ये चतुर्थ वर्षात/सातव्या सत्रात प्रवेश घेण्यास अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना 'C' स्कीममध्येच चतुर्थ/ सातवे व आठवे सत्र पूर्ण करण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून **एक वेळ संधी** (One Time Opportunity) देण्यात येत आहे.

१) सदरची संधी केवळ 'C' स्कीममधील चतुर्थ / अंतिम वर्ष पूर्ण करुन घेण्यासाठीच आहे. सातवे सत्र जे विद्यार्थी मंडळाच्या RG4 नुसार पूर्ण करतील त्यांनाच आठव्या सत्रात प्रवेश देण्यात येऊन आठवे सत्र पूर्ण करुन घेण्याची संधी द्यावी.

२) सातव्या सत्रात सत्रकाम पूर्ण न केल्यामुळे जे विद्यार्थी थोपविले जातील (Detained/Disallowed) त्यांनी संधी गमावली आहे, असे समजण्यात यावे व त्यांना आठव्या सत्रात प्रवेश देऊ नये.

३) सदर संधी अंतर्गत प्रवेश देण्यापूर्वी प्राचार्यांनी स्वत: विद्यार्थ्यांना/पालकांना संपूर्ण मार्गदर्शन करावे.

४) हिवाळी परीक्षा २०११ मध्ये मागील सत्रांच्या अनुत्तीर्ण विषयात जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील व मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार सातव्या सत्राकरीता प्रवेशास पात्र होतील त्यांना उन्हाळी परीक्षा २०१२ मध्ये सातव्या व आठव्या सत्राची परीक्षा देता येईल.

५) या सर्व विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा घेऊन चाचणीचे गुण संस्थेच्या रजिस्टरमध्ये उचित पध्दतीने नोंदवून ठेवावेत व विद्यार्थी ज्यावेळी परीक्षा देण्यास पात्र होतील त्यावेळी विहित पध्दतीने गुण मंडळाकडे पाठवावेत. विद्यार्थी चाचणी परीक्षेत अनुपस्थितअसल्यास शून्य गुण देण्यात यावेत.

६) ही संधी केवळ सत्रकाम पूर्ण करुन घेण्यासाठीच असल्याने अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यार्थी परीक्षेस बसण्यास पात्र होईपर्यंत भरुन घेण्यात येऊ नये. याबाबत अत्यंत दक्षता बाळगावी. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन घेऊन त्यांना परीक्षेस बसविल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल व त्यांची संलग्नता काढून घेण्याबाबतही शिफारस केली जाईल व विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

...२...

७) ही संधी घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत दर्शविलेल्या नमुन्यात मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे रु.१००/- एवढे शुल्क भरुन अर्ज करुन परवानगी घ्यावी.

८) सदर विद्यार्थ्यांनी रु.२०/- च्या ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर सोबत जोडलेल्या नमुन्यात बंधपत्र सादर करणे बंधन राहील.

९) जादा तासिका घेऊन नियमित विद्यार्थ्यांबरोबर या विद्यार्थ्यांचे सत्रकाम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची राहील.

( जी. बी. धनोकार )
संचालक,
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

सोबत : १) अर्जाचा नमुना
२) बंधपत्र नमुना

प्रत:-

१. अध्यक्ष, नियामक मंडळ, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ तथा संचालक तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी.
३. उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे/औरंगाबाद/नागपूर आणि मुंबई उपविभाग.
४. प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
५. प्राचार्य, Part Time Diploma चालविणाऱ्या संस्था
६. का. क्र. ४०, ४२, ४३ व ४५ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
७. वेब पोर्टल मॅनेजर यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

# अर्जाचा नमुना

( विद्यार्थ्याने विभागीय कार्यालयांत संस्थेमार्फत सादर करावा )

प्रति,

----------------------

----------------------

----------------------

( मार्फत - संस्थाप्रमुख )

**विषय :- C अभ्यासक्रमांतील (GPDL & Part Time Diploma) विद्यार्थ्यांना चौथे व पाचवे सत्र (C Pattern) पूर्ण करण्याची एक वेळ संधी देण्याबाबत.**

**संदर्भ :- 1) परीक्षा नियम RG 5-C**

**2) परीपत्रक क्र.मरातंशिमं/का-५०/1Time Opportunity/२०११/४७४२ दि. १० जून २०११**

उपरोक्त संदर्भान्वये व विषयानुषंगाने सातव्या सत्राचे सत्रकाम पूर्ण करण्याची परवानगी मिळण्याकरिता मी, खाली सही करणार विद्यार्थी अर्ज सादर करीत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षा नियम RG 4 नुसार मी ७ व्या सत्रांत प्रवेश घेण्यास अपात्र आहे. तथापि उपरोक्त संदर्भिय परिपकान्वये, केवळ सत्रकाम पूर्ण करण्यास संधी देण्यात आली असून मी ---------------------------- पदविका अभ्यासक्रमाच्या ७ व्या सत्रात प्रवेश घेऊन सत्रकाम पूर्ण करु इच्छितो. करीता मला परवानगी द्यावी ही विनंती.

मंडळाच्या परीक्षा नियमानुसार पात्र होईन तेव्हाच मला परीक्षेस बसण्याची संधी मिळेल याबाबत, मला संस्थेने जाणीव करुन दिलेली आहे. तसेच सत्रकाम पूर्ण करण्याबाबत मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील नियम RG 4 मला बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे. तसेच यासोबत बंधपत्र सादर करावयाचे आहे याची मला जाणीव असून बंधपत्रातील सर्व बाबी मला मान्य आहेत.

७ व्या सत्राचे सत्रकाम पूर्ण करण्याची संधी मला द्यावी, हि विनंती

आपला/आपली विश्वासू

सही

नांव -

नोंदणी क्र.-

## घोषणा पत्र

मी घोषित करतो की, विद्यार्थ्यास संपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले असून सर्व संबंधित नियमांची (RG 4 इ.) माहीती करून देण्यात आली आहे. विद्यार्थी संधीचा लाभ घेण्यास उत्सुक आहे. करीता त्याचा अर्ज सादर करीत आहे.

संस्थेचा शिक्का

सही

प्राचार्यांचे नांव :

संस्था :

**UNDERTAKING**
**बंधपत्र**
( २०/- रु. ज्युडिशियल स्टँम्प पेपरवर विद्यार्थ्याने द्यावयाचे )

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये ५ वे ६ वे सत्र(GPDL & Part Time Diploma) सी अभ्यासक्रमांत पूर्ण करण्याची संधी ................**

**संदर्भ :- परीपत्रक क्र.मरातंशिमं/का-५०/1Time Opportunity/२०११/४७४२ दि. १० जून २०११**

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये तथा विषयानुषंगाने मी खालीलप्रमाणे बंधपत्र सादर करीत आहे.

१. सदरची संधी मी स्वेच्छेने स्विकारीत आहे.
२. माझा ७ व्या सत्रांतील प्रवेश केवळ सत्रकाम पूर्ण करण्याकरीता आहे व परीक्षा नियमानुसार मी परीक्षेस बसल्यास जेव्हा पात्र होईन तेव्हाच मला परीक्षा देता येईल.
३. ७ व्या सत्रात मी सत्रकाम पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास मला थोपविण्यात (Detained) येईल व ८ व्या सत्रांत प्रवेश दिला जाणार नाही.
४. हिवाळी परीक्षा २०११ मध्ये मागील सत्राच्या विषयांत मी उत्तीर्ण झाल्यास मी ७ व्या तथा ८ व्या सत्रांचे सत्रकाम मी नियमानुसार पूर्ण केल्यास उन्हाळी परीक्षा २०१२ मध्ये मी ७ व्या तथा ८ व्या सत्राची परीक्षा देण्यास पात्र होईन.
५. निर्धारीत कालावधीत मी पदविका पूर्ण करु शकलो/शकले नाही तर मला मंडळाने घोषित केलेल्या समकक्ष विषयांची परीक्षा द्यावी लागेल.

सही

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव :
नोंदणी क्र.:
अभ्यासक्रम :

स्थळ :-
दिनांक :-

साक्षीदाराची सही :-

साक्षीदाराचे नांव :-